# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०


**संदर्भ : रासेयो/१८-१९/३७५** **दि.०९/०१/२०१९**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे, अहमदनगर व नाशिक**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : 'उत्कर्ष-२०१८' सांस्कृतिक स्पर्धा निवडचाचणी शिबिराबाबत**

मा. महोदय/महोदया,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सन २०१८-१९ वर्षात **'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक** स्पर्धेचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे २७ ते ३० जानेवारी २०१९ दरम्यान करण्यात येणार आहे. सदर **'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक** स्पर्धेत महाराष्ट्रातील १६ विद्यापीठांमधून प्रत्येकी १९ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी होतात. या स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचा ९ स्वयंसेवक, ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रम अधिकारी संघनायक याप्रमाणे १९ जणांचा संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या संघाकरिता निवडचाचणी शिबिराचे आयोजन **१४ जानेवारी २०१९** रोजी **संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** या ठिकाणी करण्यात आले आहे. स्पर्धा खालील प्रकारात घेतली जाईल.

१. **नृत्य** : **संकल्पना नृत्य** (Creative Dance), **(रासेयो संकल्पनेवर आधारित)**
२. **संगीत** : **समूहगीत, ताल/सूर/लोकवाद्य वादन, भारतीय लोककला - पोवाडा, भारूड, भजन इ.**
३. **साहित्य** : **निबंध, वादविवाद, कविता**
४. **नाट्य** : **पथनाट्य, एकपात्री अभिनय**
५. **ललितकला** : **भित्तीचित्र घोषवाक्यासहित**
६. **छायाचित्रण**
७. **पथसंचलन**

वरीलप्रमाणे **'उत्कर्ष'** या सांस्कृतिक स्पर्धेच्या निवडचाचणी शिबिराकरिता आपल्या महाविद्यालयातील सहभागी होणाऱ्या **१ विद्यार्थी** व **१ विद्यार्थीनी** (वरीलप्रमाणे स्पर्धेत विशेष प्राविण्य असणाऱ्या) यांची नावे **दि. १२ जानेवारी २०१९** पर्यंत पुढील नमुन्यात nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर (मेलचा विषय Utkarsha-2018 Student List या विषयासह) मेलद्वारे पाठवण्यात यावीत, **तसेच नावे पाठविलेल्या विद्यार्थ्यांना निवड चाचणी शिबिराकरिता दि. १४ जानेवारी २०१९** रोजी **स. १०.००** वाजेपर्यंत **संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** याठिकाणी वरील प्रमाणे कलाप्रकाराच्या संपूर्ण तयारीने पाठवावे, सदर निवड चाचणी शिबिरातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना **दि. १७ ते २६ जानेवारी २०१९** दरम्यान विद्यापीठामध्ये आयोजित सराव शिबिरामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. याबाबतची पूर्वकल्पना संबधित विद्यार्थीना देण्यात यावी. निवड चाचणीकरिता महाविद्यालयाने स्वयंसेवकांचा महाविद्यालय ते विद्यापीठ व परत महाविद्यालय असा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करावा. कळावे, ही विनंती.

| Name of College --------------------------------- | | | | PO Name & Contact ------------------------------- | |
|---|---|---|---|---|---|
| No. | Name | Class | Date of Birth | Mobile No. | Event |
| 1 (F) | | | | | |
| 2 (M) | | | | | |

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**